# 25 ठाणे लोकसभा मतदार संघ

**146 ओवळा माजीवडा विधानसभा मतदार संघ, भाईंदर (प.),**
**महामानव शिव शाहू फुले आंबेडकर स्मृती सभागृह,बेथनी**
**हॉस्पीटलच्या बाजुला पोखरण रोड न.02 ठाणे(प) 400606**
EMAIL ID : 146election2024@gmail.com

**जा.क्र./निवडणुक/काविः- 20 /2023-24** **दि.15/04/2024**

**निवडणुक तात्काळ**

## // प्रसिध्दी पत्रक //

25 ठाणे लोकसभा मतदार संघामधील 146 ओवळा माजीवडा वि.म.संघ कार्यक्षेत्रातील मा. सहा. निवडणुक निर्णय अधिकारी श्रीम. शितल देशमुख, नोडल अधिकारी तथा उपायुक्त (शिक्षण), श्रीम. वर्षा दिक्षित यांच्या मार्गदर्शनानुसार 25 ठाणे लोकसभा मतदार संघातील 146 ओवळा माजीवडा वि.म.संघात मिरा भाईंदर महानगर पालिका क्षेत्रात दि.14/04/2024 रोजी काशिमिरा शिवाजी पुतळा ,येथे सकाळी 08.30 ते 9.30 वाजेपर्यंत, 10.30 वाजता मनपा मुख्यालय ,लता मंगेशकर नाटयगृह दहिसर चेकनाका येथे सकाळी 11.00 ते 12.00 पर्यंत,अभिनव विदयामंदिर क्रिकेट मैदान , गोडदेव गांव येथे दुपारी 2.00 ते 4.00 पर्यंत तसेच बुध्द विहार, रामदेव पार्क मिरा रोड येथे साय. 5.00 ते 7.00 वाजे पर्यंत स्वीप (sveep) अंतर्गत मतदार नोंदणी व मतदान जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त श्री.संजय काटकर साहेबांनी सकाळी 9.00 वाजता छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर मनपाचे उपस्थीत सर्व उपायुक्त, सहा. आयुक्त, अधिकारी व कर्मचारी तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त जमलेले आंबेडकरी अनुयायी नागरीक/लहान मुले/मुली व प्रेक्षक यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या शुभेच्छा देवुन त्यांच्या समवेत संवाद साधला व मतदान करा या आशयाचे बॅनर लावुन फोटो काढण्यात आले.

146 ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघाचे स्वीप कार्यक्रमाचे नोडल अधिकारी तथा सहा.आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका श्री. सुनिल यादव यांनी प्रबुध्द विचार मंचाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त लता मंगेशकर नाटयगृह येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमात उपस्थित आंबेडकर प्रेमी नागरीक यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त शुभेच्छा देवुन मतदार नोंदणी व मतदान करणे संदर्भात थोडक्यात माहिती दिली.मतदार नोंदणी दि. 23/04/2024 पर्यंत सुरु आहे. 25 ठाणे लोकसभा मतदार संघाची निवडणुक दि.20/05/2024 सोमवार या दिवशी जाहीर झाली असुन सदर दिवशी मतदान असल्याने कुठेही फिरायला न जाता सर्व नागरीकांनी मतदार यादीत नाव असलेल्या आपल्या कुटुंबियास(आई,वडील,भाउ,बहीण,मित्र व शेजारी) मतदान करण्यास प्रोत्साहीत करावे असे आवाहान स्वीप (sveep) नोडल अधिकारी श्री. सुनील यादव यांनी केले.

स्वीप (sveep) पथक प्रमुख श्री.कैलास शेवंते , श्री. नितीन राठोड व पथकातील कर्मचारी वर्ग यांनी मनपा मुख्यालयात व अभिनव विदयामंदिर क्रिकेट मैदान ,गोडदेव गांव येथे क्रिकेट खेळाडु यांना दुपारी 2.00 ते 4.00 या वेळेत मतदार नोंदणी व मतदार जनजागृजी संदर्भात माहीती दिली.

स्वीप(sveep) पथक प्रमुख श्री. कैलास शेवंते व मनपा कर्मची वर्ग यांनी सम्राट अशोक बुध्द विहार व्यव्रस्थापन समितीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त बुध्द विहार , रामदेव पार्क मिरा रोड पुर्व येथे सायंकाळी 5.00 वाजता आयोजित केलेल्या कार्यक्रमात उपस्थित आंबेडकर प्रेमी नागरीक यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त शुभेच्छा देवुन दिनांक 23/04/2024 पर्यंत मतदार नोंदणी करीता राज्य निवडणुक आयोगा मार्फत उपलब्ध करुन दिलेल्या nvsp.in व voterhelpline चा वापर करता येईल तसेच 18 वर्ष पुर्ण झालेल्या सर्वांना मतदानाचा हक्क आहे तो दिनांक 20/05/ 2024 रोजी आपल्या कुटुंबा समवेत मतदान करुन बजवावा असे आवाहन केले.

दिनांक 14/04/2024 रोजी मतदान जनजागृती संदर्भात विविध कार्यक्रम घेण्यात आले. सदर कार्यक्रमास मिरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त श्री.संजय काटकर, उपायुक्त सर्व ,सहा. आयुक्त तथा 146 ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघाचे स्वीप नोडल अधिकारी श्री. सुनील यादव ,स्वीप(sveep) पथक प्रमुख श्री. कैलास शेवंते व मनपा अधिकारी /कर्मचारी वर्ग, आंबेडकर प्रेमी अनुयायी,ज्येष्ठ नागरीक,मुले,मुली,क्रिकेट खेळाडु, व सामाजिक कार्यकर्ते मोठया संख्येने व उत्साहाने उपस्थीत होते. मतदार जनजागृतीच्या राष्ट्रीय कार्यक्रमास सहकार्य केल्या बददल मिरा भाईंदर मनपाचे सहा.आयुक्त तथा 146 ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघाचे स्वीप नोडल अधिकारी श्री. सुनील यादव व स्वीप पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी सर्वाचे आभार मानले.

15.4.24

(रवी पवार)

उपायुक्त(मु.) तथा जिल्हा नोडल अधिकारी

स्वीप 146 ओवळा माजीवडा वि.म.स.